MHKO180007592022

**फौजदारी किरकोळ अर्ज क्र.११२/२०२२**

श्री. गजानन बाळासो परीट वि. महाराष्ट्र सरकार

**जप्त मुद्देमाल परत देणेबाबत आदेश नि.१.**

सदर अर्ज, अर्जदार श्री.गजानन बाळासो परीट, रा.परीट गल्ली, कुरुंदवाड, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर यांनी त्यांच्या मालकीचा Vivo कंपनीचा मॉडेल नं. Y30 IMEI 1: 867940057939471 व IMEI 2: 867940057939463 चा परत मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. सदर मोबाईल हा कुरुंदवाड पोलीस ठाणे गु.र.नं.२२१/२०२२ मुं.जुगार प्रतिबंधक कायदा कलम ४ व ५ या गुन्हयाखाली जप्त केलेला आहे. या गुन्हयाखाली जप्त केलेला आहे. सदर अर्जाबाबत तपासी अंमलदार व सरकारी वकीलांचे म्हणणे मागविण्यात आले. सरकारी वकीलांच्या म्हणण्यानुसार, सदर कामात तपासी अंमलदार यांचे म्हणणे आहे, तरी योग्य तो आदेश व्हावा ही विनंती. तसेच तपासी अंमलदार यांचे म्हणण्यानुसार सदरचा मोबाईल अर्जदार यांना परत देणेस आमची काही हरकत नाही.

३. अर्जदाराने सदर अर्जासोबत मोबाईलची पावतीची व्हेरीफाईड प्रत व अर्जदाराचे आधारकार्डाची व्हेरीफाईड प्रत इ. कागदपत्रे सादर केली आहेत.

४. सदर अर्जदाराचे वकीलांचा युक्तिवाद ऐकला. त्यांचे म्हणणे असे आहे की, अर्जदारांना त्यांचे कुटुंबाशी संपर्क करणेसाठी आवश्यक आहे. वर नमुद मोबाईल पोलीस स्टेशनला तसाच पडून राहिलेस खराब होवुन त्याचे नुकसान होणार आहे. सदर मोबाईल अटी व शर्तीवर परत करण्यास त्यांनी विनंती केली आहे

५. अर्जदाराने त्याच्या अर्जासोबत दाखल केलेल्या कागदपत्रानुसार ती मोबाईल अर्जदाराचाच आहे हे प्रथमदर्शनी दिसून येते. याउलट अर्जदाराच्या म्हणण्यानुसार मोबाईल त्यांना कुटुंबाशी संपर्क करणेकरीता आवश्यक आहे. वर नमुद मोबाईल पोलीस स्टेशनला तसेच पडून राहिलेस खराब होवुन त्याचे नुकसान होणार आहे. त्यामुळे सदर जप्त मोबाईल हा अर्जदारास पडताळणी करुन दिल्यास कुठलेही नुकसान होणार नाही. सबब, खालील अटी व शर्तीवर मोबाईल अर्जदारास परत करण्याबाबत खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार श्री.गजानन बाळासो परीट, रा.परीट गल्ली, कुरुंदवाड, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर यांच्या मालकीचा Vivo कंपनीचा मॉडेल नं. Y30 IMEI 1: 867940057939471 व IMEI 2: 867940057939463 असून तो परत मिळणेबाबत रुपये १५,०००/– चे बंधपत्र संबंधीत पोलिस ठाण्यात दयावे.

३. अर्जदाराने न्यायालयाचे परवानगीशिवाय मोबाईल विक्री किंवा हस्तांतरीत करु नये अथवा त्याचे स्वरुप बदलू नये. तसेच कोणत्याही गुन्हयात त्याचा वापर करु नये.

४. न्यायालयाचे आदेशाप्रमाणे गरज असेल त्यावेळेस सदर प्रकरणात मोबाईल न्यायालयात हजर करावे.

५. बंधपत्रासोबत अर्जदाराने त्याचे ओळखपत्र व हमीपत्र संबंधीत पोलिस ठाण्यात दाखल करावे.

६. तपासी अंमलदाराने पंचनामा व पडताळणी करुन सदर मोबाईल अर्जदाराचे ताब्यात दयावे.

Atul Arun Kulkarni

Digitally signed by Atul Arun Kulkarni
Date: 2022.12.06 17:39:20 +0530

दिनांक – १४.११.२०२२

(अ.अ.कुलकर्णी)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कुरुंदवाड.